## प्रेस नोट दिनांक ०९/०२/२०१८

## मेस्ट्रो/ज्युपीटर/ॲक्टीवा/ गाडीच्या डिकीतून किंमती ऐवज चोरणाऱ्या सोलापूर येथील तीन सराईत चोरटयांना गुन्हे शाखा, युनिट १, पुणे शहरच्या टिमने केली अटक

पुणे शहरामध्ये रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी पार्क केलेल्या मेस्ट्रो/ज्युपीटर/ॲक्टीवा गाडीच्या डिकीतून बनावट चावीने तसेच चावी न लावता डिकीच्या खालील बाजूने असलेली केबल ओढून डिकी उघडून पार्क केलेल्या दुचाकी मधून लोकांचे किंमती ऐवज चोरत होते. त्यामध्ये मोबाईल हँडसेट, किंमती वस्तू, तसेच पर्स मधील पैसे चोरी जाणेचे बरेच प्रकार झाले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट-१, पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी त्याबाबत शोध घेत असतांना युनिट १ चे पो.हवा. ४१६ प्रकाश लोखंडे व पो.शि. ८४०३ गजानन सोनुने यांना मिळालेल्या बातमीनुसार तीन इसम चोरीचे मोबाईल विक्रीसाठी युनिकॉन मोटार सायकलवरून झेड ब्रिज खाली, डेक्कन येथे येणार असलेबाबत बातमी मिळाल्याने, त्या ठिकाणी बातमीप्रमाणे सापळा रचुन तीन इसमांना संशयावरून पकडून त्यास त्यांचे नांव पत्ता विचारता त्यांनी आपले नांव पत्ता १) विनायक चंद्रकांत खैरमोडे, वय ३४ वर्षे, रा. ३४५, शुक्रवार पेठ,सोलापूर २) राकेश रमेश गदगे, वय २५ वर्षे, रा. १० सोमवार पेठ,सोलापूर ३) सचिन नागनाथ शिंदे, वय २५ वर्षे, रा. ५१, शुक्रवार पेठ, ढोर गल्ली, सोलापूर असे असलेचे सांगीतले. आरोपी क्र. १ याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे बिगर सिमकार्डचे दोन मोबाईल मिळून आले. त्याबाबत संशय आलेने त्यांना विश्वासात घेवून सखोल तपास केला असता, सदरचे मोबाईल त्यांनी पुणे शहरातील सार्वजनिक ठिकाणी, उद्याने, मंदीर,कॉलेजजवळ अशा गर्दीच्या ठिकाणी बसून लोक जेंव्हा गाडी पार्क करतात, त्यावेळी लक्ष ठेवून असत, व कोण डिकीमध्ये काय ठेवते यावर लक्ष ठेवत होते. गाडीचा मालक त्यांचे मेस्ट्रो/ज्युपीटर/ॲक्टीवा गाडी पासून दूर जाताच सदर आरोपी हे गाडी पार्क केली असतांना बनावट चावीने तसेच चावी न लावता डिकीच्या खालील बाजूने असलेली केबल ओढून डिकी उघडून चोरी करीत असलेचे सांगितले आहे. सदरचे आरोपी हे सिंहगड कॉलेज जवळ रुम भाडयाने घेवून तेथील कॉलेजच्या विद्यार्थ्याप्रमाणे रहात असेलेने त्यांची आतापर्यंत कोणीही विचारणा केलेली नाही.

त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी मागील सहा महिन्यात सोलापूर येथून येवून डेक्कन पोलीस स्टेशन हद्दीत ०२, कोथरुड पोलीस स्टेशन हद्दीत ०२, येरवडा पोलीस स्टेशन हद्दीत ०१, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन हद्दीत ०१, शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत ०१, दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत ०१, सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीत ०१, असे एकुण ०९ गुन्हे केलेचे निष्पन्न होवून त्यांचेकडून १,३५,०००/- रु. किं.चा. मुद्देमाल (०५ मोबाईल हँडसेट, एक युनिकॉन मो.सा., व रोख २१,०००/- रु.) जप्त करण्यात आला आहे. आरोपी नं. १ याचेवर यापूर्वी अशाच प्रकारचे सोलापूर येथे चोरीचे ३६ गुन्हे दाखल असून त्यास सोलापूर शहरातून एका वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. तसेच आरोपी नं. २ याचेवर सोलापूर येथे ०१ शरीराविरुध्दचा गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.हवा. प्रकाश लोखंडे, गजानन सोनुने, अशोक माने, सुधाकर माने, मोहन येलपले, राजू पवार, मेहबुब मोकाशी, रिजवान जिनेडी, सुभाष पिंगळे, सचिन जाधव, इम्रान शेख, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, प्रशांत गायकवाड, यांनी केली आहे.